


दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • २६५ • RNI : MAHMAR/2023/87818 • शुक्रवार दि.१ ऑगस्ट २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# माणिकराव कोकाटेंना रमी खेळणे भोवले

## दत्तात्रय भरणेंकडे सोपवली कृषी खात्याची जबाबदारी, तर कोकाटेंकडे क्रीडा खाते

**मुंबई (वृत्तसंस्था)–माणिकराव कोकाटे यांना विधिमंडळाचे कामकाज सुरू असताना मोबाइलवर रमी खेळबे भोवले असल्याचे समोर आले आहे. माणिकराव कोकाटे यांचे कृषी खाते बदलून त्यांना क्रीडा खाते देण्यात आले आहे. विरोधकांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती, परंतु कोकाटे यांचे खाते बदल करण्यात आले आहे.माणिकराव कोकाटे हे राज्याचे कृषिमंत्री होते. परंतु, विधिमंडळ कामकाजात मोबाइलवर रमी खेळतानाचा व्हिडिओ शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी व्हायरल केला होता. त्यानंतर विरोधकांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. त्यानंतर कोकाटे यांनी आपण रमी खेळत नसल्याचे सांगितले होते. आता त्यांच्या जागी दत्तात्रय भरणे यांना कृषिमंत्री पद देण्यात आले असून माणिकराव कोकाटे यांना क्रीडा खाते देण्यात आले आहे.**




विधानसभेत रमी खेळणाऱ्या माणिकराव कोकाटे यांच्याकडील कृषिखाते बदलण्यात आलं आहे. कृषिखात्याची जबाबदारी आता दत्तात्रय भरणे यांच्याकडे देण्यात आलं आहे. तर भरणे यांच्याकडील आधी असलेलेय क्रीडा आणि युवक कल्याण खाते कोकाटे यांच्याकडे देण्यात आलं आहे.राज्याचे पावसाळी अधिवेशन सुरू असताना मंत्री माणिकराव कोकाटे हे विधानसभेत मोबाईलवर रमी खेळत होते. त्याचा व्हिडीओ रोहित पवारांनी पोस्ट केला होता. त्यानंतर माणिकराव कोकाटे यांनी राजीनामा द्यावा यासाठी विरोधकांनी सरकारवर दबाव टाकला होता. परंतु कोकाटे यांचा राजीनामा न घेता फक्त त्यांच्या खात्यामध्ये बदल करण्यात आला आहे.





### दतात्रय भरणे कृषिमंत्री

माणिकराव कोकाटे यांच्या खातेबदलाची चर्चा सुरू होती. आता त्यांच्याकडील खाते हे दत्तात्रय भरणे यांच्याकडे देण्यात आलं आहे. तर दत्तात्रय भरणे यांच्याकडे असलेले क्रीडा आणि युवक कल्याण मंत्रालयाची जबाबदारी माणिकराव कोटाटे यांच्याकडे देण्यात आलं आहे.

### रमीला राज्य खेळाचा दर्जा द्या

राज्यात शेतकरी संकटात असतानाही कृषिमंत्री असलेले माणिकराव कोकाटे हे विधानसभेत रमी खेळताना दिसले. असं असतानाही त्यांचा राजीनाम न घेता फक्त त्यांच्या खात्यात बदल करण्यात आला. खाते बदलले ही काही कारवाई आहे का असा प्रश्न विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी विचारला. आता रमी खेळाला राज्य खेळाचा दर्जा द्या अशी खोचक मागणी त्यांनी केली. यापुढे मंत्र्यांना, सत्ताधाऱ्यांना पत्ते घेऊन सभागृहात येण्याची जाहीर परवानगी द्यावी अशीही मागणी त्यांनी केली.

# जनतेच्या प्रेमातून मिळते गरिबांची सेवा करण्याची ऊर्जा-आ.सुधीर मुनगंटीवार

## वाढदिवसाला लाडक्या बहिणींकडून जाहीर सत्कार



**बल्लारपूर । प्रतिनिधी**

लोकांचे प्रेम मिळत आहे म्हणूनच सर्वसामान्यांचा आवाज होऊन सभागृहात लढणे शक्य होत आहे. या प्रेमामुळेच गरिबांची सेवा करण्याची ऊर्जा मिळते. या प्रेमाच्या कर्जातून कधीही मुक्त होऊ शकणार नाही, या शब्दांत राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

बल्लारपूर येथील माजी नगरसेवक महेंद्र ढोके यांनी आयोजित केलेल्या सोहळ्यात लाडक्या बहिणींनी आ. मुनगंटीवार यांचा वाढदिवसाच्या निमित्ताने जाहीर सत्कार केला. त्यावेळी आ. मुनगंटीवार बोलत होते. या कार्यक्रमाला वनविकास मंडळाचे माजी अध्यक्ष चंदनसिंग चंदेल, भाजपा बल्लारपूर शहराध्यक्ष रणंजय सिंह, माजी अध्यक्ष काशी सिंह, निलेश खरबडे, समीर केणे, मनीष पांडे, देवेंद्र वाटकर, सतीश कनकम,कांता ढोके, जयश्री मोहुर्ले, रेणुका दुधे, पुनम मोडक, सुवर्णा भटारकर, विद्या देवाळकर, सचिन जाधव, सारिका कनकम, आरती आक्केवार, किशोर मोहूर्ले,विक्की दुपारे आदींची प्रमुख उपस्थिती होती. आ. मुनगंटीवार म्हणाले, माझा वाढदिवस आपण सेवादिन म्हणून साजरा केलात, सर्वांच्या साक्षीने प्रेम व्यक्त केले, त्याबद्दल आभारी आहे. गरिबांच्या चेहऱ्यावरचा आनंद हेच आमचे ध्येय आहे. एखादा कार्यकर्ता अश्यापद्धतीने जनतेची, निराधारांची सेवा करतो. गरिबांचे प्रश्न सोडविण्यासाठी पूर्ण शक्तीने काम करतो, तेव्हा खूप आनंद होतो. भारतीय जनता पार्टीची खरी संपत्ती महेंद्र ढोके यांच्यासारखे कार्यकर्ते आहेत.

या प्रेमामुळे अधिक काम करण्याची, शक्तीने सेवा करण्याची ऊर्जा मिळते. जनतेच्या प्रेमातूनच शक्ती मिळत असते. तेच खरे सेवाकार्याचे टॉनिक असते. त्यामुळे तुमच्या प्रेमाचा आशीर्वाद मिळविण्याचा मी आज कार्यक्रमाला उपस्थित राहीलो . बहिणींचा आशीर्वाद मिळाला तर जगातील कुठलीही ताकद आपले वाईट करू शकत नाही,अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली. १९९८ पासून वाढदिवसाच्या दिवशी मी कुठल्यातरी मंदिरात असतो. यंदाही मी उज्जैनला भगवान महादेवाच्या दर्शनासाठी गेलो होतो. माझ्यासह कार्यकर्ते आणि सर्वसामान्य जनतेला भरपूर सुख-समृद्धी देण्याची कामना केली, असेही आ. मुनगंटीवार म्हणाले.

# भिकारी म्हणणाऱ्या मंत्र्यांना बक्षीस म्हणून दुसरे खाते

## राज्य सरकारवर सुप्रिया सुळे यांचा हल्लाबोल

**मुंबई । विराम पवार**

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी काही दिवसांपूर्वी सरकारला भिकारी असा उल्लेख केला होता. तरीदेखील त्यांचा राजीनामा न घेता त्यांना दुसरे महत्वाचे खाते सोपवण्यात आले. यावर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)च्या खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली.

सुळे म्हणाल्या, महाराष्ट्र शासनाला 'भिकारी' म्हणून राज्याची प्रतिष्ठा धुळीस मिळविणाऱ्या मंत्रीमहोदयांना नारळ देण्यासाठी खुद्द मुख्यमंत्री महोदयांनीच पुढाकार घ्यायला पाहिजे. विधिमंडळात रमी खेळल्याचे बक्षीस म्हणून त्यांना राज्याचे क्रीडा व युवक कल्याण आणि अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्रीपद देण्याचा निर्णय खरोखरच अनाकलनीय आहे. या सरकारचे प्राधान्यक्रम काय आहेत याची चिरफाड यामुळे झाली.

एकीकडे राज्यातील तरुण पिढी ऑनलाईन रमीच्या मागे लागून बरबाद होत असताना तिच्यावर बंदी घालण्याची मागणी होत आहे. तरीदेखील माणिकराव कोकाटे यांना विधिमंडळात रमी खेळल्याचे बक्षीस म्हणून क्रीडा व युवक कल्याण यासारखे महत्वाचे खाते दिले जाते यासारखा दुसरा क्रूर विनोद नाही, असा टोला त्यांनी लगावला.

दरम्यान, माणिकराव कोकाटे यांच्या कृषी खात्याची जबाबदारी दत्तात्रय भरणे यांच्याकडे देण्यात आली आहे, तर त्यांच्याकडील क्रीडा व युवक कल्याण विभागाची जबाबदारी कोकाटेंकडे सोपवण्यात आली आहे. या निर्णयानंतर विरोधकांनी सरकारवर टीकास्त्र



सोडले.सुप्रिया सुळे यांनी कोकाटेंच्या कार्यशैलीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना म्हटले, राज्यातील कृषी क्षेत्र पुर्णपणे कोलमडून पडलेले असताना विधिमंडळात बसून रमी खेळणारे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर किती संवेदनशील असतील? याहून कहर म्हणजे या कृषीमंत्र्यांचे केवळ खाते बदलून अभय देणारे सत्ताधारी किती गंभीर असतील? याची शंका आल्याशिवाय राहत नाही. आपले पद आणि जबाबदारी यांची किंचितही जाणीव नसणारी व्यक्ती मंत्रीमंडळात आहे, याची खरंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खंत बाळगली पाहिजे.काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे आमदार रोहित पवार यांनी माणिकराव कोकाटे यांचा विधिमंडळातील रमी खेळतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल केला होता. त्यानंतर विरोधकांनी कोकाटेंच्या राजीनाम्याची मागणी सुरू केली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील त्यांची कानउघाडणी केली होती, तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांना 'इजा, बिजा, तिजा' अशा शब्दांत इशारा दिला होता. या पार्श्वभूमीवर अखेर कोकाटेंची कृषिमंत्री पदावरून उचलबांगडी करण्यात आली आहे.

# शेतकरी संघटनेच्या आजी-माजी सरपंचांसह काँग्रेसच्या अनेक कार्यकर्त्यांचा भाजपात पक्ष प्रवेश

## सर्वांच्या सहकार्यातून गोंडपिपरी तालुक्याच्या विकासाला अधिक गती मिळेल-आमदार देवराव भोंगळे







**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

तालुक्यात राजकीय घडामोडींना वेग आला असून आज पोंभुर्णा येथे आमदार सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या महाआरोग्य शिबीरात आमदार देवराव भोंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये गोंडपिपरी तालुक्यातील पानोरा, चेकपारगांव व सुपगांव येथील शेतकरी संघटनेचे आजी-माजी सरपंच तसेच लाठी, सरांडी व पारडी येथील काँग्रेसच्या अनेक कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

या नवप्रवेशितांमध्ये शेतकरी संघटनेचे पानोराचे सरपंच जनार्दन ढुमणे, चेकपारगांवच्या सरपंचा मनिषा निखाडे आणि माजी सरपंच बंडू गिरसावळे यांचा समावेश होता; तर काँग्रेसचे लाठी येथील कार्यकर्ते देवराव मरसकोल्हे, पारडी येथील सुरेश मडावी, संतोष पचारे, संदिप पचारे आणि सरांडी येथील सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता वारलू मेश्राम, रमेश जगताप, संजय घोडाम, भिवसेन कोटनाके, आनंदराव कोटनाके, लक्ष्मन चिंचोलकर व विजय भोयर यांनी भाजपची वाट धरली आहे.

या पक्षप्रवेशामुळे गोंडपिपरी तालुक्याच्या विकासाला अधिक गती मिळेल, असा विश्वास व्यक्त करीत आपल्या सर्वांच्या सहकार्याने गोंडपिपरी तालुका विकासाच्या दिशेने वेगाने वाटचाल करेल असे प्रतिपादन आमदार देवराव भोंगळे यांनी यावेळी स्वागतपर बोलतांना केले.

या पक्षप्रवेशाला तालुकाध्यक्ष दिपक सातपुते, माजी जि.प. सदस्य अमर बोडलावार, भाजपा महिला मोर्चाच्या महामंत्री कु. अल्काताई आत्राम, नगराध्यक्षा अश्विनी तोडासे, इंद्रपाल धुडसे, शहराध्यक्ष चेतनसिंह गौर, अर्चना भोंगळे, विजय शेरकुरवार, राकेश पुन, महामंत्री कोमल फरकाडे, भावनाथ सोमलकर, अरूणा जांभुळकर, शारदा गरपल्लीवार, सुरेखा श्रीकोंडावार, शिथिल लोणारे, वैभव बोनगिरवार, मनोज वनकर, तेजस्वीता भगत आदिंची प्रामुख्याने उपस्थिती होती.

# सुधीरभाऊ मुनगंटीवार नावाचा समानार्थी शब्द सेवा असाच होतो-आमदार देवराव भोंगळे

## आ.सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त राजुरा येथे भव्य महाआरोग्य शिबिर संपन्न

### एकाच छताखाली ४३६४ हून अधिक नागरीकांना लाभ; तर ५०३ रुग्ण विविध शस्त्रक्रियेस पात्र








**राजुरा । प्रतिनिधी**

रंजल्या-गांजल्यांच्या सेवेला धावून जाण्याचा सेवामंत्र आम्हाला लोकनेते, आमदार सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी दिला आहे. जिल्ह्यात कुठेही आरोग्याची समस्या भासली तर लोकांच्या ओठी आशेने सुधीरभाऊंचे नाव येते. त्यामुळे सुधीरभाऊ मुनगंटीवार म्हणजे सेवा असा समानार्थी शब्दच आता जिल्ह्यात रूढ झाला आहे. त्यासाठी त्यांच्या सेवाभावी व्यक्तिमत्त्वाला साजेसा उपक्रम राबवून ३० जुलै हा त्यांचा वाढदिवस महाआरोग्य शिबीरासारख्या आरोग्यसेवेच्या माध्यमातून साजरा करण्यासाठी आम्ही संकल्पबद्ध आहोत. अशी भावना आयोजक तथा आमदार देवराव भोंगळे यांनी आपल्या उद्घाटनीय मनोगतातून व्यक्त केली.

माजी मंत्री तथा आमदार श्री. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त राजुरा येथील महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयात आयोजित केलेल्या भव्य महाआरोग्य शिबीरात ते बोलत होते.

काल (दि. ३०) पार पडलेल्या या महाआरोग्य शिबीरात नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट नागपूरचे डॉ. पवन अरगडे व त्यांच्या चमूने संशयीत शिबिरार्थींच्या कॅन्सर तपासण्या केल्या. तर व्हिएसपीएम दंत महाविद्यालयाच्या चमूने शिबीरार्थींच्या दंत चाचण्या व दंत आरोग्यासंबंधी सेवा पुरविली. आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी (मेघे), भारतीय जनता पार्टी राजुरा शहर व ग्रामीण, ग्रामीण रुग्णालय राजुरा, तालुका आरोग्य अधिकारी व चमू यांच्या सहकार्याने पार पडले असून या महाआरोग्य शिबीराचा ४३६४ नागरीकांनी लाभ घेतला असून त्यापैकी ५०३ रुग्ण हे विविध आजारांवरील शस्त्रक्रियेस पात्र ठरले आहेत. या सर्व शिबीरार्थींवर ५ ऑगस्टपासून मोफत शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. अशी माहीती ही आयोजक म्हणून त्यांनी यावेळी दिली.पुढे बोलताना, आरोग्य सेवेसारखे दुसरे पुण्य नाही. आजच्या धावपळीच्या जीवनात ग्रामीण भागातील गोरगरिब बांधव आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात; अनेकदा पैशाअभावी अतीगंभीर आजार अंगावर काढतात त्यामुळे आरोग्याच्या दृष्टीने भविष्यात अनेक समस्या उद्भवू शकतात. अशावेळी गोरगरिब बांधवांना पायाच्या नखापासून तर डोक्याच्या केसापर्यंत भेडसावणाऱ्या समस्यांचे एकाच छताखाली निदान, उपचार व मोफत शस्त्रक्रिया करून देण्यासाठी हे महाआरोग्य शिबीर आशेचे किरण ठरतात. दरवर्षीच या शिबिरांना मोठे जनसमर्थन ही मिळते. आदरणीय सुधीरभाऊंच्या वाढदिवशी नरसेवा हिच नारायणसेवा मानून जनता-जनार्दनाला आरोग्यसेवा देत खऱ्या सेवाभावाने सुधीरभाऊंच्या दिर्घायुष्याची कामना करणे आम्हाला आत्मीक समाधान देऊन जाते, असेही ते म्हणाले.

या शिबिरांच्या यशस्वीतेसाठी भाजपचे तालुकाध्यक्ष वामन तुराणकर, शहराध्यक्ष सुरेश रागीट, डॉ. सुशील मुंदडा, डॉ. रवी आलुरवार, डॉ. मंगेश टिपणीस, जिल्हा उपाध्यक्ष सुनील उरकुडे, हरिदास झाडे, दिलीप गिरसावळे, मिलिंद देशकर, सतीश कोमरवल्लीवार, भाऊराव चंदनखेडे, शंकर धनवलकर, भाऊराव बोबडे, बृहस्पती साळवे, राधेश्याम अडाणीया, विनोद नरेंदुलवार, अजय राठोड, स्वप्निल राजूरकर, सचिन डोहे,मंगेश श्रीराम, सागर भटपल्लीवार, बापुराव मडावी,आकाश गंधारे, श्रीकृष्ण गोरे, प्रफुल घोटेकर, सचिन बल्की, सचिन भोयर, स्वप्निल राजूरकर, प्रफुल कावळे, मयुर झाडे, वैभव पावडे, लक्ष्मण निरांजने, दिपक झाडे, संजय वासेकर, छबिलाल नाईक, राजकुमार भोगा, अंकुश कायरकर, निलेश वाढई, प्रदीप पाला, रवी ठाकूर, सिनु उत्ननुरवार, रामावतार सोनी, रोशन बंडेवार, जगदीश साठोणे, पुनम शर्मा, प्रणय विरमलवार, अंकुश चव्हाण, महेंद्र बुरटकर, किशोर रागीट,आकाश चिंचाळकर, प्रदीप मोरे, नितीन सिडाम, मंगल चव्हाण, मिथून थिपे, महेश झाडे, नितीन वासाडे, माया धोटे, पौर्णिमा उरकुडे, गौरी सोनेकर, स्वरूपा झंवर, प्रिती रेकलवार, रजनी बोढे , शुभांगी रागीट, ममता केशेट्टीवार, प्रियदर्शनी उमरे, योगिता भोयर, लक्ष्मी बिश्वास,शांता कदम, सारीका शहा, दिपा बोंथला, मीरा कुलकर्णी, प्रतिक्षा पिपरे, सरिता कोंडावार, सपना कोंडावार, मंगला काळे, उज्वला शेंडे, सविता खनके, अश्विनी कोकोडे, महेश ठाकरे,अजय उमरे, प्रदीप मोरे, सलमान खान, रवी रेकलवार, राहुल ढोले, जयवंत कोंडावार, चेतन काटवले, शुभम राखुंडे, तुषार कोरडे, अविनाश ठाकरे, सचिन भटकर आदिंनी परिश्रम घेतले.

# कासारे प्राथमिक आरोग्य केंद्राची दयनीय अवस्था प्रशासनाच्या ढिसाळ कारभारावर जनतेचा संताप!





**धुळे स उमाकांत अहिरराव**

साक्री तालुक्यातील कासारे प्राथमिक आरोग्य केंद्र एकेकाळी राज्यभर आपल्या उत्कृष्ट आरोग्यसेवेसाठी प्रसिद्ध होते. मात्र आज ते अक्षरशः मृतप्राय अवस्थेत पोहोचले आहे. प्रवेशद्वारावरील भगदाड, पॅथॉलॉजी व ओपीडी विभागातील गळणारी छते, पडणारा प्लास्टर, स्वच्छ पाण्याचा अभाव, तसेच डॉक्टर व कर्मचारी वर्गाचा कायमचा तुटवडा या स्थितीने संपूर्ण गावच नव्हे तर तालुका हादरला आहे.

दुरुस्तीसाठी कोट्यवधींचे अनुदान मंजूर झाले, परंतु ठेकेदारांकडून निकृष्ट साहित्य वापरल्याच्या आरोपांनी स्थिती जैसे थेच राहिली. दुरुस्ती झाल्यानंतर अवघ्या काही महिन्यांतच इमारत पुन्हा गळायला लागली आहे. डॉक्टरांसाठी निवास व्यवस्था असूनही, महिन्याभरात एकही वैद्यकीय अधिकारी निवासी नसणे ही तर आरोग्य विभागाची उघडीपणे खिल्ली उडवणारी बाब ठरली आहे.

तालुका आरोग्य यंत्रणा, जिल्हा आरोग्य अधिकारी, गटविकास अधिकारी आणि स्थानिक लोकप्रतिनिधी - सर्वांनीच दुर्लक्ष केल्यामुळे कासारे पीएचसी मृतप्राय झाले आहे. निवड समितीचे प्रदेशाध्यक्ष अनिल दादा देसले यांनी या संदर्भात वेळोवेळी पिण्याच्या पाण्याची सोय, कर्मचारी भरती व इमारतीच्या दुरुस्तीसाठी पाठपुरावा केला, पण आरोग्य यंत्रणा अजूनही मौन बाळगून आहे.

### जनतेचा टोकाचा सवाल ही उपेक्षा किती दिवस सहन करायची?

**एकेकाळी संपूर्ण महाराष्ट्रात नावाजलेली ही आरोग्यसेवा आज उपेक्षेच्या गर्तेत का बुडाली आहे? आरोग्य प्रशासनातील गोंधळ, ठेकेदारांचा निष्काळजीपणा आणि लोकप्रतिनिधींचे मौन या तिन्ही गोष्टींचा फटका थेट गावकऱ्यांना बसत आहे. कासारे पीएचसी जणू हंबरडा फोडत म्हणतेय कुणीतरी डोळे उघडा रे मी अजून जिवंत आहे!**

### डॉ.प्रीती गावित सेवाभावाचे तेजस्वी उदाहरण

**या सर्व दुर्दशेच्या पार्श्वभूमीवरही डॉ. प्रीती गावित यांचे नाव आजही गावकऱ्यांच्या मनात अमिट आहे. कोविड काळात स्वतःचा जीव धोक्यात घालून, अहोरात्र सेवा बजावणाऱ्या डॉ. गावित यांनी कर्तव्यनिष्ठा आणि संवेदनशीलतेचे असे उदाहरण घालून दिले की, आजही लोक म्हणतात डॉ.गावित प्रीती सारखे अधिकारी भविष्यात मिळणं कठीण आहे.**

**अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप (बाबा) पाटील खंडापूरकर यांच्या आदेशानुसार जर प्रशासनाने तातडीने उपाययोजना केली नाही, तर तीव्र आंदोलन उभारले जाईल, अशी स्पष्ट चेतावणी देण्यात आली आहे. आंदोलनाची वेळ आलीच तर आम्ही मागे हटणार नाही, असा इशारा अनिल दादा देसले यांनी दिला आहे.**

# १ ते ७ ऑगस्ट पर्यंत साजरा होणार महसूल सप्ताह

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय महसुली कामे वेळेच्या वेळी पूर्ण करून त्यानुसार अभिलेख अद्ययावत करणे, मोजणी करणे, अपील प्रकरणांची चौकशी करणे, महसूल गोळा करणे तसेच संबंधित कामे उत्कृष्ट पध्दतीने करणा-या व महसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करणा-या अधिकारी आणि कर्मचा-यांचा सत्कार करण्यासाठी दरवर्षी १ ऑगस्ट हा महसूल दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

तसेच महसूल विभागाकडून देण्यात येणा-या सेवा आणि विभागाकडून राबविण्यात येणा-या विविध योजनांबाबत नागरिकांमध्ये जागरुकता वाढावी, शासनाबद्दल आणि शासनाच्या कामकाजाबद्दल नागरिकांचा विश्वास वृध्दिंगत व्हावा, यासाठी विशेष मोहीम व लोकाभिमुख उपक्रम राबविण्याच्या उद्देशाने १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत महसूल सप्ताह साजरा करण्याच्या सुचना शासनाने दिल्या आहेत. या अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे.

असे राहील महसूल सप्ताहाचे स्वरुप : १ ऑगस्ट रोजी महसूल दिन साजरा करणे व महसूल सप्ताहाचा शुभारंभ होईल. महसूल संवर्गातील कार्यरत /सेवानिवृत्त अधिकारी - कर्मचारी यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण व लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्र वितरण समारंभ.

२ ऑगस्ट रोजी शासकीय जागेवर सन २०११ पूर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटुंबांपैकी अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र असलेल्या कुटुंबांना अतिक्रमित जागांचे पट्टे वाटप कार्यक्रम.

३ ऑगस्ट रोजी पाणंद/ शिवरस्त्यांची मोजणी करून रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावणे.

४ ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान प्रत्येक मंडळनिहाय राबविणे.

५ ऑगस्ट रोजी विशेष सहाय्य योजनेतील डीबीटी न झालेल्या लाभार्थ्यांना घरभेटी करून अनुदानाचे वाटप करणे.

६ ऑगस्ट रोजी शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे निष्काषित करणे.

७ ऑगस्ट रोजी एम. सँड धोरणाची अंमलबजावणी करणे व नवीन मानक कार्यप्रणालीप्रमाणे धोरण पूर्णत्वास नेणे आणि महसूल सप्ताह सांगता समारंभ आयोजित करण्यात येणार आहे.महसूल सप्ताहानिमित्त राबविण्यात येणा-या विविध उपक्रमांचा जिल्ह्यातील नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रभारी जिल्हाधिकारी डॉ. नितीन व्यवहारे यांनी केले आहे.

# फसवणूक झालेल्या गुंतवणुकदारांनी आर्थिक गुन्हे शाखेमध्ये संपर्क करण्याचे आवाहन

## शिवलक्ष्मी महिला नागरी सह.पत निधी लिमिटेड प्रकरण

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

विविध योजना तसेच अधिक पैशाचा परतावा मिळण्याचे आमिष दाखवून, शिवलक्ष्मी महिला नागरी सहकारी पत निधी लिमीटेड शेगाव (बु.) या पतसंस्थेमध्ये फसवणूक झालेल्या नागरिकांनी आर्थिक गुन्हे शाखा, पोलिस अधिक्षक कार्यालय, चंद्रपूर येथे संपर्क करावा, असे आावाहन पोलिस विभागाने केले आहे.



वरोरा तालुक्यातील शेगाव (बु.) येथील रहिवासी अब्दुल रहेमान शेख इस्माईल यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, शिवलक्ष्मी महिला नागरी सहकारी पत निधी लिमिटेडचे संचालक मनोज खोंडे, सुभाष चाफले, श्रीकांत घाटे यांनी ८ फेब्रुवारी २०२२ मध्ये शेगाव बु. यथे पत निधीची स्थापना केली. स्थानिक लोकांना एजंट, व्यवस्थापक व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक करून स्थानिक लोकांना गुंतवणुकीचे प्रलोभन दिले. विविध योजनांमध्ये गुंतवणूक केल्यास खूप फायदा होईल, याकरीता वाढीव व्याजदर, दाम दुप्पट परतावा, तात्काळ लोन सुविधा, लखपती बनण्याच्या योजना, पिकनीक कर्ज, तारण कर्ज, बचत गटांना कर्ज अशा विविध योजनांबाबत आमिष दाखविले.

स्थानिक गुंतवणुकदारांना विश्वासात घेऊन पतसंस्थेचे संचालक आरोपी मनोज खोडे, सुभाष चाफले, श्रीकांत घाटे व इतर आरोपींनी एकूण १ कोटी २ लक्ष ७३ हजार ५७८ रुपयांची अफरातफर केल्याप्रकरणी पोलिस स्टेशन शेगाव बु. येथे भारतीय न्यास संहिता ३१८(४), ३१६ (२), ३१६(५), ३(५) सहकलम ३ एमपीआयडी ॲक्ट १९९९ अन्वये गुन्हा नोंद असून तपास आर्थिक गुन्हे शाखा चंद्रपुर करीत आहे.

या प्रकरणी ज्या गुंतवणूकदाराची फसवणूक झाली आहे, अशा गुंतवणूकदाराच्या रक्कमेच्या याद्या तयार करणे सुरू आहे. तसेच ज्या गुंतवणूकदारांची रक्कम परत मिळाली नाही, अशा गुंतवणूकदारानी गुंतवणुकीचे कागदपत्र (गुंतवणूकिचे प्रमाणपत्र, रक्कम जमा पावत्या, आधार कार्ड, पॅन कार्ड ज्या खात्यावर पैसे पाहिजे त्या राष्ट्रीयकृत बँक खात्याच्याा पासबुकची झेरॉक्स प्रत) इ. माहितीसह महाराष्ट्र शासन परीपत्रक क्रमांक एम पी आय /प्र.क्र. ०९/पोल-११ दिनांक २५/०२/२०१९ अन्वये गुंतवणूकदाराचे परीशिष्ठ- १ प्रमाणे फार्म भरून देण्याकरीताा आर्थिक गुन्हे शाखा, (पोलिस ठाणे दुर्गापुर परिसर) पोलिस अधिक्षक कार्यालय चंद्रपुर येथे तसेच आर्थिक गुन्हे शाखेचे सहा. पोलिस निरीक्षक पंकज बेसाणे (मो. नं.७५८८५१८५४९) यांच्याशी संपर्क करावा, असे पोलिस विभागाने कळविले आहे.

# वरोरा शहरातील शासकीय जमिनीवर राहणाऱ्या कुटुंबांना कायमस्वरूपी पट्ट्यांची मागणी

## शिवसेना शिष्टमंडळाने तहसीलदारांना दिले निवेदन

**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा शहरातील कॉलरी वॉर्ड, कर्मवीर वॉर्ड, राजीव गांधी वॉर्ड, मालवीय वॉर्ड आणि आजाद वॉर्ड या परिसरांमध्ये गेल्या ३५ ते ४० वर्षांपासून शासकीय (महसूल) जमिनीवर राहत असलेल्या कुटुंबांना कायमस्वरूपी पट्टे देण्यात यावेत, अशी मागणी शिवसेना लोकसभा संघटक मुकेश जिवतोडे यांच्या मार्गदर्शनात शिवसेना शिष्टमंडळाने तहसीलदार वरोरा यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.या वसाहतींमधील नागरिक २०११ पूर्वीपासून संबंधित जमिनींवर वास्तव्यास असून त्यांनी त्या वेळेपासून स्थानिक कर नियमितपणे भरले आहेत. मात्र, अद्यापही त्यांना शासकीय स्तरावर कोणताही अधिकृत मालकी हक्क किंवा कायमस्वरूपी पट्टा देण्यात आलेला नाही. त्यामुळे या नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजना, घरकुल योजना, शासकीय कर्ज व अन्य सुविधांचा लाभ मिळू शकत नाही. यामुळे त्यांच्या मुलभूत गरजा आणि विकासाच्या संधी अडचणीत येत आहेत. शासन निर्णयानुसार २०११ पूर्वीपासून राहत असलेल्या आणि कर भरणाऱ्या कुटुंबांना



कायमस्वरूपी पट्टे देण्याची प्रक्रिया सुरू करता येऊ शकते. त्यामुळे लवकरात लवकर सर्व पात्र कुटुंबांची पाहणी करून त्यांना पट्टे मंजूर करावेत, अशी मागणी यावेळी करण्यात आली.हे निवेदन देताना शिवसेनेचे माजी शहरप्रमुख संदीप मेश्राम, माजी नगरसेवक जावेद शेख, शिवसेना पदाधिकारी गोलू वाढई, अनिकेत काळे, सोहेल अली, गजानन टोंगे आदी उपस्थित होते. तहसीलदारांनी निवेदनाची दखल घेत लवकरच आवश्यक कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन दिले.

# २६ वर्षांनंतर माजी विद्यार्थ्यांचा भावनिक स्नेहमेळावा-जुन्या आठवणींना दिला उजाळा





**वायगाव । प्रतिनिधी**

यशवंत विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, वायगाव निपाणी येथे १९९९ च्या दहावी व २००१ च्या बारावीच्या बॅचने २६ वर्षांनंतर एकत्र येत शाळेचा दिवस पुन्हा अनुभवला. एक भावनिक आणि उत्साही वातावरणात स्नेहमेळावा पार पडला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य चंद्रकांत ठाकरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्राचार्य विकास खोडके, सुनंदा धरमपुरीया, साधना घोडकांदे, नंदा झलके, राजेंद्र लांबट, शेषराव ठाकरे, शिवाजी चाटसे यांच्यासह अन्य शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात शालेय प्रार्थना व कवायतींनी झाली. झलके यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत विद्यार्थ्यांची हजेरी घेतली, तर विकास खोडके गणिताचा तास घेत नवचैतन्य निर्माण केले. साधना घोडकांदे यांनी कणा ही कविता शिकविताना उपस्थितांना भावविवश करत संकटांना सामोरे जाण्याचा प्रेरणादायी संदेश दिला. शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा देत माजी विद्यार्थी आणि शिक्षक एकत्र गप्पांमध्ये रमले. विद्यार्थ्यांनी आपल्या माजी शिक्षकांचा विशेष सत्कार उपहार व सन्मानपत्र देवून केला. शिक्षकांनीही आपल्या आठवणी, अनुभव आणि मनोगते शेअर करत विद्यार्थ्यांना भावनिक केले. प्राचार्य चंद्रकांत ठाकरे यांनी अशा कार्यक्रमांमुळे शाळेचा गौरव वाढतो, असे मत व्यक्त केले. विकास खोडके सरांनी जुन्या आठवणीत रमून एक सुंदर गीत सादर करून टाळ्यांचा कडकडाट मिळवला. इतर शिक्षक आणि विद्यार्थ्यांनीही शाळेतील दिवसांची आठवण करत आपल्या भावना व्यक्त केल्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितेश झाडे यांनी केले. प्रास्ताविक सचिन सातपुते तर आभार प्रदर्शन हिमानी बानोकर हिने केले. कार्यक्रमानंतर सर्वांनी एकत्र भोजनाचा आनंद घेत पुढील भेटीचे वचन देत निरोप घेतला.या स्नेहमेळाव्याच्या आयोजनात दादा राजनकर, अनिल वाघमोडे, विवेक गंधारे, राजेश तराळे, राहुल अतकरे, महेश नरड, गणेश वाळके, माधुरी चरडे, प्रतिमा पाटील, योगिनी मोते, सविता देशमुख यांचे विशेष सहकार्य लाभले.

# गावकऱ्यांनी 'आनंददायी शनिवार' उपक्रमात सक्रिय सहभागी व्हावे-सुरेंद्र बेलुरकर

**तुळजापूर वघाळा (वा.) । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक मंडळाच्या पुढाकाराने २०२४ पासून सुरू झालेल्या 'आनंददायी शनिवार' या अभिनव उपक्रमास गावकऱ्यांचा अधिकाधिक सहभाग मिळावा, असे आवाहन सेवाग्राम दवाखान्याचे सामाजिक कार्यकर्ते सुरेंद्र बेलुरकर यांनी केले आहे.



या उपक्रमाअंतर्गत प्रत्येक शनिवारी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी विविध खेळ, स्पर्धा, गाणी, चर्चा सत्रे तसेच मार्गदर्शन कार्यक्रम राबवले जातात. या उपक्रमात गावातील निवृत्त शिक्षक, डॉक्टर, वकील, शेतीतज्ज्ञ, संगीत शिक्षक, तसेच विद्यार्थ्यांच्या भल्यासाठी इच्छुक नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. बेलुरकर म्हणाले, अर्धा ते एक तास वेळ देऊन आपण गावातील मुलांच्या सर्वांगीण विकासात मोलाचा वाटा उचलू शकतो. या उपक्रमातून मुलांना केवळ अभ्यासापुरती मर्यादा न ठेवता जीवनाशी संबंधित विविध ज्ञान मिळू शकते.त्यांनी पुढे सांगितले की, गावातील विविध भजन मंडळे, महिला मंडळे, स्वयंसेवी संस्था यांनी सामाजिक जाण ठेवून या उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा. दिवसभर राजकारण वा निष्क्रिय चर्चांमध्ये वेळ घालवण्यापेक्षा, समाजहिताच्या कार्यात सहभागी होणे अधिक आवश्यक आहे, असेही ते म्हणाले.गावातील प्रत्येक नागरिकाने पुढाकार घेऊन स्थानिक शाळांमध्ये जाऊन शिक्षकांशी संपर्क साधावा, आपल्या कौशल्यांचा वापर करावा आणि 'आनंददायी शनिवार' या चळवळीचा एक भाग व्हावे, असेही आवाहन त्यांनी यावेळी केले.

# पोलिस स्टेशन सिंधी रेल्वे पोलीस पथका कडून दारू विक्रेता विरोधात धडक कार्यवाही

## ४४ हजात ८८० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**

पोलीस स्टेशन सिंदी रेल्वे येथील पथकाने आज दी. ३०/०७/२०२५ रोजी पोलिस स्टेशन सिंदी रेल्वे येथे नेमणुकीस असलेले पोलिस अमलदार नितीन नखाते यांना मुखाबिरद्वारे खात्रीशीर माहिती मिळाली की, होंडा कंपनीची काळ्या रंगाची दुचाकी क्र MH-32-AM-0448 ने अवैधरित्या देशी विदेशी दारूचा माल पोलिस स्टेशन सिंदी रेल्वे अंतर्गत येणाऱ्या ड्रायपोर्ट जवळून सेल्डोह कडे जाणार आहे अश्या माहिती वरुन पोलिसांनी सापळा लाऊन पोलिस स्टेशन येथील पथकाने रेड केला असता आरोपी हा दुचाकी व अवैध दारूचा माल सोडून पळून पळून गेला सदर घटनेचा जागीच पंचनामा कारवाही करून पोलिस स्टेशन ला



येऊन अनोळखी आरोपी विरुद्ध कलम ६५ अ, ई ७७अ नुसार आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार गुन्हा नोंद करण्यात आला. सदर करीवाही मध्ये ४४८५० रुपयाचा माल जप्त करण्यात आला.

सदर कारवाही पोलिस निरीक्षक नरेंद्र निस्वादे ठाणेदार पोस्टे सिंधी रेल्वे यांच्या मार्गदर्शनात पोलीस हवालदार प्रफुल्ल डफ, पोलीस अमलदार कांचन चाफले, उमेश खामनकर, नितीन नखाते, मंगेश मुडे सर्व नेमणूक पोलीस स्टेशन सिंधी रेल्वे यांनी केली.

# माजी राज्यमंत्री रणजीतदादा कांबळे यांचा वाढदिवस वृक्षारोपणाने साजरा



**देवळी । प्रतिनिधी**

माजी राज्यमंत्री तथा प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष रणजीतदादा कांबळे यांच्या वाढदिवसानिमित्त देवळी सहकारी शेतकी खरेदी-विक्री समिती मर्यादितच्या वतीने वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा करण्यात आला.

खरेदी-विक्री परिसरात विविध प्रकारची झाडे लावून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत हा उपक्रम उत्साहात पार पडला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष अमोल कसनारे, व्यवस्थापक च. ल. मून, संचालक सुनील बासू, संदीप आडकीने, सुरेश खडसे, दत्ता मसने, गणेश पाचाडे, मंगेश येसनखेडे, अशोक कपूर, प्रमोद ठाकरे, विजय पेटकर, मनोज दिर्घीकर, हेमंत कापकर, तसेच महिला पदाधिकारी किशोरीताई डफळे, सिंधुताई ठाकरे, व्यापारी वैभव डफरे व संतोष कामनापूरे आदी मान्यवर उपस्थित होते.

या उपक्रमात खरेदी-विक्री संघाचे कर्मचारी यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत मोलाचे सहकार्य केले. पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने योगदान देत वाढदिवस साजरा करण्याची ही पद्धत उपस्थितांच्या विशेष कौतुकास पात्र ठरली.

# जगदीश माळोदे यांचा सेवानिवृत्ती निमित्त सन्मान समारंभ संपन्न





**पुलगाव । प्रतिनिधी**

वर्धा नागरी सहकारी बँक, पुलगाव शाखेतील निष्ठावान कर्मचारी जगदीश रायभानजी माळोदे ३१ जुलै रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त एक स्नेहसमृद्ध सत्कार समारंभ बँकेच्या वतीने आयोजित करण्यात आला.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी बँकेचे अध्यक्ष डॉ. विनय देशपांडे होते. कार्यक्रमास पालक संचालक गणेशराव इंगळे, हितेश पैकीने, माजी संचालक बाबाराव देशमुख, माजी अधिकारी देविदास डाहे, अनिरुद्ध अभ्यंकर हे मान्यवर प्रमुख उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात शाखाधिकारी प्रविण सावरकर यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यानंतर अध्यक्ष डॉ. विनय देशपांडे यांनी शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन माळोदे यांचा औपचारिक सत्कार केला.जगदीश माळोदे यांच्या प्रदीर्घ सेवेमध्ये त्यांनी दाखवलेली प्रामाणिकता, शिस्त आणि ग्राहकाभिमुख कार्यशैली याचा गौरव उपस्थित मान्यवरांनी केला. त्यांच्या सेवाभावी वृत्तीबद्दल सहकाऱ्यांनी विशेष कौतुक केले.यावेळी माळोदे यांच्यासोबत उपस्थित असलेल्या त्यांच्या पत्नी रंजना माळोदे, मुलगा प्रज्वल माळोदे व मुलगी समिक्षा माळोदे यांचाही गणेशराव इंगळे, मनोज राऊत, उमादेवी बियाला यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

अनिरुद्ध अभ्यंकर, अविनाश भोपे, सचिन मुळे यांनी आपले मनोगत व्यक्त करत, माळोदे यांच्या सहवासातील आठवणी उलगडल्या. हितेश पैकीने यांनी माळोदे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या व त्यांना भावी आयुष्यासाठी सदिच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या शेवटी मोहनीश हलमारे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सोनाली मुळे, अक्षय लोहकरे, विजय वरवाडे, नेत्रा कराळे, गौरी, पायल यांनी परिश्रम घेतले.

# पळसगाव बाईचे सरपंच धीरज लेंडे यांना राज्यस्तरीय ग्रामरत्न पुरस्काराने सन्मान



**वर्धा । प्रतिनिधी**

जिल्ह्यात आदर्श ग्राम म्हणून नावारूपास आलेल्या पळसगाव बाई गावाचे सरपंच धीरज लेंडे यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत अखिल भारतीय सरपंच परिषद, महाराष्ट्र राज्य यांच्यातर्फे राज्यस्तरीय ग्रामरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. लोणावळा येथे दिनांक ३० जुलै २०२५ रोजी पार पडलेल्या समारंभात त्यांना सन्मानपत्र प्रदान करण्यात आले.पळसगाव बाईमध्ये जलसंधारण, नदी खोलीकरण आणि पाणीसाठ्याचे अचूक नियोजन करत गावाला २४ तास पाणीपुरवठा सुरू केला. तंटामुक्त गाव म्हणून नाव कमावत सर्व तंटे समोपचाराने सोडवले. पाच वर्षांत रस्ते, नाले, वाचनालय, संगणक लॅब, व्यायामशाळा, ओपन जिम इत्यादींच्या माध्यमातून भौतिक विकास साधला. कचरामुक्त आणि हगणदारीमुक्त गाव बनवून शहरासारख्या सुविधा गावात उपलब्ध केल्या.गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार समीरभाऊ कुणावार, माजी खासदार रामदासजी तडस, चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री पंकज भोयर यांचे भरीव सहकार्य लाभले. मनरेगा व अभिसरण योजनेतून बचतगट भवन, सिमेंट रस्ते, पेव्हर ब्लॉक यासारखी कामे गावात पूर्णत्वास नेली.गावकऱ्यांच्या सहभागातून विविध समित्या स्थापन करून त्यांच्यावर जबाबदारी देण्यात आली. तीर्थक्षेत्र विकास व पर्यटन विकासासाठीही विशेष प्रयत्न करत श्री संत सखुबाई देवस्थानच्या सहकार्याने निधी उपलब्ध करून घेतला.

**धीरज लेंडे हे गावासाठी झटणारे, निधीसाठी वारंवार पाठपुरावा करणारे सरपंच आहेत. त्यांची तळमळ पाहता कुठल्याही निधीची कमतरता होऊ दिली नाही. ग्रामरत्न पुरस्कार मिळाल्याचा अतिशय आनंद वाटतो.**

**-आ. समीरभाऊ कुणावार**

**धीरजची चिकाटी, जिद्द व सातत्य हे प्रेरणादायी आहे. त्यांनी पळसगाव बाईचा राज्यात आदर्श ग्राम म्हणून लौकिक वाढवला.**

**-मा. खासदार रामदास तडस**

**धीरजने गावासाठी भरीव निधी आणून विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या. तीर्थक्षेत्र विकासासाठीही त्याने मोठे योगदान दिले.**

**-सुरेश लेंडे, अध्यक्ष,संत सखुबाई देवस्थान**

**हा पुरस्कार माझा नाही, तर संपूर्ण गावाचा आहे. गावकऱ्यांनी माझ्या स्वप्नांना आपले मानले आणि सहकार्य केले, म्हणूनच हे शक्य झाले. मी हा सन्मान गावकरी, मित्रमंडळी, अधिकारी आणि आमदार समीरभाऊ यांना समर्पित करतो.**

**-धीरज लेंडे, सरपंच**

# शासकीय आयटीआयमध्ये सोलर टेक्नीशियन (इलेक्ट्रिकल) अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

**वर्धा । प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या ऊब्द्ध नवी दिल्ली यांच्यामार्फत न्यू एज कोर्स अंतर्गत सोलर टेक्नीशियन (इलेक्ट्रिकल) या नव्या व्यवसाय अभ्यासक्रमास मान्यता देण्यात आली आहे. ऑगस्ट २०२५ प्रवेश सत्रासाठी वर्धा जिल्ह्यातील विविध शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये या अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.या अभ्यासक्रमासाठी शासकीय आयटीआय वर्धा, आष्टी, समुद्रपूर, आर्वी आणि कारंजा (घाडगे) या संस्थांची निवड करण्यात आली आहे.

सोलर टेक्नीशियन (इलेक्ट्रिकल) हा अभ्यासक्रम आधुनिक युगाच्या गरजांनुसार अत्यंत उपयुक्त असून, या कोर्सच्या माध्यमातून प्रशिक्षणार्थींना नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीच्या संधी तसेच स्वयंरोजगाराची दिशा मिळू शकते. त्यामुळे या अभ्यासक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

**प्रवेशाबाबत आवश्यक माहिती पुढीलप्रमाणे:**

१. प्रवेश पात्रता: १० वी उत्तीर्ण

२. प्रवेश क्षमतेची मर्यादा: २० प्रशिक्षणार्थी

३. प्रवेश प्रक्रिया: केंद्रीकृत ऑनलाईन पद्धतीने (Centralized Online Process)




४. अर्ज सादर व माहितीपुस्तिका: www.admission.dvet.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध

५. प्रशिक्षण कालावधीत सुविधा: प्रशिक्षणार्थ्यांना दरमहा ५०० विद्यावेतन

एकूण जागांपैकी ३०% जागा मुलींसाठी राखीव

या अभ्यासक्रमामार्फत प्रशिक्षण घेणाऱ्या तरुण-तरुणींना सौर ऊर्जा क्षेत्रात रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत, असे प्रतिपादन जिल्हा नोडल आयटीआय वर्धा चे प्राचार्य एस. एस. कोकुलवार यांनी केले.

# लोकनेते सुधीरभाऊ मुनगंटीवार म्हणजे सेवेचे दुसरे रुप-आ.देवराव भोंगळे यांचे प्रतिपादन

## आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त घुग्घुस येथे भव्य मोफत रोगनिदान, शस्त्रक्रिया, चष्मे वाटप व महाआरोग्य शिबीराचे आयोजन

### एकाच छताखाली ७३७४ हून अधिक नागरीकांना लाभ; तर ६८१ रुग्ण विविध शस्त्रक्रियेस पात्र






**घुग्घुस । प्रतिनिधी**

येथील प्रयास सभागृहात बुधवार, ३० जुलै रोजी महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री, लोकनेते, विकासपुरुष मा. आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य महाआरोग्य शिबिर (मोफत रोगनिदान व शस्त्रक्रिया) व चष्मे वाटप शिबीराचे आयोजन पार पडले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय चंद्रपूर, जिल्हा सामान्य रुग्णालय चंद्रपूर, आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी मेघे, प्रा. आ. केंद्र घुग्घुस आणि भारतीय जनता पार्टी घुग्घुस शहराच्या वतीने शहरातील तसेच ग्रामीण परिसरातील नागरिकांना मोफत रोगनिदान व उपचार करता यावा याकरिता भव्य महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून एसीसी कंपनीचे प्लांट हेड सत्यनारायण दिग्मर्थी, एच.आर. प्रफुलकुमार पाटील, वेकोलिचे पिसा रेड्डी, घुग्घुस वेकोलि वणी क्षेत्राचे उपक्षेत्रीय प्रबंधक मनीष पोडे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भास्कर सोनारकर, डॉ. सुभाष ठाकरे, डॉ. राजेश गडिया, डॉ. प्रकाश साठे, डॉ. निलेश पडगेलवार, डॉ. गंगाधर तडस, डॉ. ललित पटले, भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे, प्रयास सखी मंचच्या अध्यक्षा किरण बोढे, माजी सभापती नितु चौधरी, भाजपा नेते निरीक्षण तांड्रा, विजय पिदूरकर, प्रदीप जेऊरकर, विनोद चौधरी, किरण बांदूरकर, तनुश्री बांदूरकर, सिनू इसारप, महेश लठ्ठा, साजन गोहने, कुसुम सातपुते, वैशाली ढवस, नंदा कांबळे, रत्नेश सिंग, संजय भोंगळे उपस्थित होते.

याप्रसंगी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून शिबीराची सुरुवात करण्यात आली तसेच प्रमुख पाहुण्यांचे स्वागत पुष्पगुच्छ सन्मानचिन्ह देऊन करण्यात आले.शिबीराच्या समारोपीय कार्यक्रमाला राजुरा विधानसभेचे आमदार देवराव भोंगळे यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

आपल्या मार्गदर्शनात आ. देवराव भोंगळे म्हणाले, सेवेचे दुसरे रुप म्हणून आ. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या सेवाभावी व्यक्तीमत्वाकडे पहिल्या जाते. लोकनेते, विकासपुरुष आ. सुधीर मुनगंटीवार यांचा वाढदिवस सेवा दिन म्हणून साजरा करण्यात येते. आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त मागील १० वर्षांपासून शहरात महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे.

पुढे बोलताना, गोर गरिबांचा मोफत उपचार व्हावा, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्यासाठी मदत करता यावी हे उदिष्ट घेऊन महाआरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात येते. नरसेवा हिच नारायण सेवा म्हणून सुधीरभाऊ झटत असतात. अशा कार्यसम्राट लोकनेत्याला उदंड व निरोगी आयुष्य लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना आज मी करतो. यावर्षी जवळपास ७ ते ८ हजार नागरिकांनी शिबिरात येऊन शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला यासाठी सर्वांचे मनापासून आभार व्यक्त करतो. असेही ते म्हणाले.

यावेळी या शिबिराचे संयोजक तथा भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की विकासपुरुष सुधीरभाऊ सारख्या गुरूचा वाढदिवस रुग्णसेवेच्या माध्यमातून कसा साजरा करावा हे आमदार देवरावदादा भोंगळे यांच्याकडून समजून घेतले पाहिजे. त्यांच्या पुढाकारातून आज जिल्ह्यात घुगुस राजुरा पोंभूर्णा येथे विस हजारांच्या रुग्णसेवा करून सुधीरभाऊंचा वाढदिवस साजरा होत आहे.या शिबिरात रक्तदाब, शुगर, किडनीचे आजार, हृदयरोग, डोळ्यांचे सर्व आजार, मोतीबिंदू, नाक, कान व घशाचे आजार, दातांचे आजार अश्या विविध आजारांची तपासणी करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन नौशाद सिद्दीकी तर आभार भाजप नेते अमोल थेरे यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भाजपाचे निरीक्षण तांड्रा, प्रयास सखी मंचच्या अध्यक्षा किरण बोढे,माजी सभापती नितु चौधरी,सुरेंद्र भोंगळे,विवेक तिवारी,अमोल थेरे,गणेश कुटेमाटे, वैशाली ढवस, बबलू सातपुते, प्रमोद भोस्कर, श्रीनिवास इसारप, विनोद चौधरी, सतीश बोन्डे, किरण बांदूरकर, तनुश्री बांदूरकर, पारस पिंपळकर, नितीन काळे, रत्नेश सिंग, सुषमा सावे, शिल्पा थेरे, अमीना बेगम, नाजमा कुरेशी,आकाश निभ्रड, हेमंत पाझारे, विनोद जंजर्ला, कोमल ठाकरे, तुलसीदास ढवस, कुसुम सातपुते, पौर्णिमा कुटेमाटे, पुष्पा रामटेके, इर्शाद कुरेशी, दिलीप कांबळे, धनराज पारखी, श्रीकांत सावे, हसन शेख, योगेश घोडके, हेमंत कुमार, रवी चुने, सुरेंद्र जोगी,नितीन काळे, शंकर सिद्दम, राकेश भेदोडकर, मूर्ती पेरपुल्ला, सागर तांड्रा, भारत साळवे, शरद गेडाम, कुलदीप इंगोले, शुभ सोदारी, सचिन कोंडावार, सिनू कोत्तूर, सुशील डांगे, मारोती मांढरे, संदेश पोलशेट्टीवार, मुस्तफा शेख, अण्णा कदम, अनिल नित, पांडुरंग थेरे, गणेश शेडके, निरंजन नगराळे यांनी परीश्रम घेतले.

## भद्रावती तहसील कार्यालयात महसूल दिन साजरा

**भद्रावती । प्रतिनिधी**

महसुल विभागामार्फत राज्यात दिनांक १ ऑगस्ट, २०२५ रोजी महसुल दिन व दिनांक ०१ ते ०७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत महसुल सप्ताह साजरा करण्याबाबत शासन निर्णयानुसार भद्रावती तहसिल कार्यालयामध्ये दिनांक १ ऑगस्ट २०२५ रोजी अभियानाचा आमदार करण देवतळे यांचे उपस्थीतीत शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी तहसीलदार राजेश भांडारकर होते. त्यांनी दिनांक १ ते ७ ऑगस्ट २०२५ या महसुल सप्ताहामध्ये घेण्यात येणा-या विवीध कार्यक्रमाची माहीती दिली. सदर कार्यक्रमामध्ये आमदार देवतळे यांच्या हस्ते महसुल विभागातील मंडळ अधिकारी अनिल दडमल, समीर वाटेकर, सहायक महसुल अधिकारी गजानन ढोबळे, देवानंद




गावंडे , प्रमोधीनी रामटेके, ग्राम महसुल अधिकारी खुशाल मस्के, विनोद चिकटे, रवि तल्लार, श्रीकांत गिते, प्रतिक्षा लोखंडे, महसुल सहायक अमर श्रीरामे, समिक्ष पडगेलवार, शिपाई शांताबाई मानुसमारे व महसुल सेवक सुरज शेंडे यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच कार्यक्रमाकरीता कर्मचाऱ्यांसह गावातील नागरीक मोठया प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन अनिल श्रृगारे आभारप्रदर्शन नायब तहसीलदार मनोज आकनुरवार यांनी केले.

## विवेकानंद विद्यालयात कारगिल विजय दिन साजरा

**भद्रावती । प्रतिनिधी**

कारगिल विजय दिन हा प्रत्येक भारतीयांसाठी अभिमानास्पद आहे. त्यापासून आपल्याला देशभक्ती व देशप्रेम यांची प्रेरणा मिळते. प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत भारतीय सैनिकांनी मिळविलेला हा विजय सदैव स्मरणात राहील असे विचार विवेकानंद ज्ञानपीठ (कॉन्व्हेंट),वरोरा चे अध्यक्ष पुरुषोत्तम स्वान यांनी व्यक्त केले. ते भद्रावती तालुक्यातील मांगली येथील विवेकानंद विद्यालयात कारगिल विजय दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. यावेळी मंचावर डॉ. यशवंत घुमे, मुख्याध्यापक अजय धात्रक, शालेय मुख्यमंत्री तेजस्वी शेंडे उपस्थित होते. पुढे बोलताना श्री स्वान यांनी सांगितले की, शैक्षणिक जीवनात विद्यार्थ्यांच्या वाट्याला अनेकदा प्रतिकूल



परिस्थिती येत असते. त्यावर मात करून कठोर परिश्रम व अभ्यास करीत विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध करावी व आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करावे.जीवनात आपल्या शाळेचे व आईबाबांचे नाव कमवा असा संदेश दिला. या कार्यक्रमाचे संचालन शिक्षिका सरिता पिट्टलवार, प्रास्ताविक सचिन काकडे, श्रीकांत चिडे यांनी केले यावेळी लिपिक भीमसिंह खैरे, विजय निब्रड, रमेश नैताम ,नागो पाटील यांच्यासह शाळेतील विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सार्वजनिक वितरण व्यवस्थेत पारदर्शकतेचा आदर्श: संचालिका सीमा कन्नमवार यांचा महसूल दिनी गौरव




**वरोरा । प्रतिनिधी**

महसूल दिनानिमित्त आयोजित मुख्य कार्यक्रमात सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील प्रामाणिक व उल्लेखनीय कार्यासाठी अंबादेवी वॉर्डातील स्वस्त धान्य दुकानाच्या संचालिका सीमा कन्नमवार यांचा तहसीलदार योगेश कौटकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या वेळी त्यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

कन्नमवार यांनी शासकीय धान्याचे वेळेत व काटेकोरपणे वितरण, पारदर्शक नोंदवही, लाभार्थ्यांची नियमित पडताळणी तसेच गरजूंपर्यंत धान्य पोहोचविण्याच्या कार्यात सातत्य व निष्ठा दाखवली आहे. या माध्यमातून त्यांनी केवळ आपले कर्तव्य पार पाडले नाही तर सामाजिक बांधिलकीही जपली, अशी प्रशंसा यावेळी करण्यात आली.सन्मान सोहळ्याला निरीक्षण अधिकारी विशाल गवई, नायब तहसीलदार गिरीश बोर्डे, लोखंडे, मसराम, मंडल अधिकारी, तहसील कार्यालयातील कर्मचारी तसेच विविध शासकीय विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.तहसीलदार कौटकर यांनी सांगितले की, हा सन्मान म्हणजे गोरगरिबांच्या घरापर्यंत स्वस्त धान्य पोहोचविणाऱ्या संपूर्ण यंत्रणेचा गौरव असून, संचालिका सीमा कन्नमवार यांनी दाखविलेला पारदर्शक व जनहितकारी कार्यपद्धतीचा आदर्श सर्व स्वस्त धान्य दुकान चालकांसाठी प्रेरणादायी आहे.

## अलिबाग तालुक्यातील धोकादायक पुलांवरून अवजड वाहतूक करण्यास मनाई

**रायगड । प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील काही महत्त्वाच्या रस्त्यांवरील पूल व स्लॅब कल्व्हर्ट संरचनात्मक दृष्ट्या धोकादायक स्थितीत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी त्या पुलांवरून अवजड वाहनांच्या वाहतुकीवर तात्काळ बंदी घालणारा आदेश जारी केला आहे.‘विजना कन्सल्टींग इंजिनिअर्स प्रा. लि.’ या संस्थेमार्फत करण्यात आलेल्या संरचनात्मक तपासणी अहवालानुसार अलिबाग-रोहा, अलिबाग-रेवदंडा, पोयनाड-उसार-भादाणे आणि भाकरवड-देहेन या मार्गावरील एकूण ८ पुलांची भार क्षमता अत्यल्प (फक्त ५ ते १६ टन) असल्याचे स्पष्ट झाले.अवजड वाहतूक बंद असलेले पूल म्हणजे रामराज पूल, सुडकोली पूल, सहाण पूल, नवेदर बेली पूल आणि देहेन पूल हे आहेत. यासाठी पर्यायी मार्गांची सोय करण्यात आली असून, अलिबाग-पेझारी नाका-कुईस वेलशेत-आंबेघर भिसे खिंड मार्गे रोहा, अलिबाग-उसार-वावे मार्गे रेवदंडा आणि पांडवादेवी-पोयनाड-पेझारी-श्रीगाव मार्गे देहेन असे मार्ग उपलब्ध आहेत. पावसाळ्यामुळे हे पूल अधिक असुरक्षित झाले असल्याने वाहनचालक व वाहतूक व्यवसायिकांनी प्रशासनाच्या आदेशाचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. अपघात टाळण्यासाठी आणि जनतेच्या सुरक्षेसाठी ही कार्यवाही करण्यात आल्याचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी स्पष्ट केले.सदर आदेश पुढील आदेश येईपर्यंत लागू राहणार असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कडक कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

## यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात सेवापूर्ती निमित्त सत्कार सोहळा



**सोलापूर । प्रतिनिधी**

विद्या विकास मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील मुख्य लिपिक श्री. विक्रमसिंह प्रतापराव सूर्यवंशी व कनिष्ठ विभागातील वाणिज्य विभागाच्या सौ. संध्या सुनिल बिले हे ३१ जुलै २०२५ रोजी सेवेतून निवृत्त झाले. त्यांच्या सेवापूर्ती निमित्त महाविद्यालयात आयोजित सत्कार सोहळा संस्थेचे सचिव विलासराव घुमरे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. बी. पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला.

सत्कारानंतर मनोगत व्यक्त करताना संध्या बिले यांनी, आमचे आधारस्तंभ मा. विलासरावजी घुमरे सर माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले,असे कृतज्ञतेने सांगितले. तर विक्रमसिंह सूर्यवंशी यांनी आपल्या मनोगतातून, विलासरावजी घुमरे सरांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून मी माझे कार्य केले व त्याचाच अंगीकार केला,असे नमूद केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. बी. पाटील यांनी दोघांना भावी आयुष्य सुख, समृद्धी आणि आनंदाने जावो, अशा शुभेच्छा दिल्या. तर सचिव विलासरावजी घुमरे यांनी,हे दोन्ही सदस्य सेवेतून निवृत्त होत असले तरी यशवंत परिवाराचे आजीवन सभासद राहतील,असे सांगून त्यांना निरोगी आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या.या प्रसंगी कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाक, कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एम. डी. जाधव यांनी केले तर आभारप्रदर्शन प्रा. नितीन तळपाडे यांनी मानले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# पुलगाव येथे भव्य मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन–मोतीबिंदू मुक्त अभियानास चालना

**पुलगाव । प्रतिनिधी**

मोतीबिंदू मुक्त पुलगाव–देवळी अभियान अंतर्गत आमदार राजेश बकाने यांच्या पुढाकाराने पुलगाव येथे एक भव्य मोफत महाआरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले आहे. हे शिबिर २ ऑगस्ट २०२५, शनिवार रोजी सकाळी १० वाजता, आर. के. हायस्कूल, पुलगाव येथे पार पडणार आहे.हे शिबिर निरामय वर्धा आणि मोतीबिंदू मुक्त वर्धा जिल्हा विशेष उपक्रमाचा भाग असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त २२ जुलै ते १५ ऑगस्ट या कालावधीत जिल्ह्यातील सर्व आठही तालुक्यांत आरोग्य शिबिरे आयोजित केली जात आहेत. देवळी तालुक्याकरिता हे शिबिर पुलगावमध्ये घेण्याचा निर्णय आमदार राजेश बकाने यांनी घेतला.या शिबिराचे आयोजन मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, जिल्हा प्रशासन वर्धा, आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, कस्तुरबा रुग्णालय सेवाग्राम, आणि इंडियन मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात येत आहे.

या शिबिरास जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, माजी खासदार रामदास तडस, माजी खासदार सुरेशराव वाघमारे, भाजपा जिल्हाध्यक्ष संजय गाते, तसेच जिल्हाधिकारी वर्धा वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी सोनम साहेब, पोलिस अधीक्षक अनुराग जैन, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुमंत वाघ हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत.आमदार राजेश बकाने यांनी सर्व संबंधित विभागांना सूचना देऊन शिबिराच्या




नियोजनाची पाहणी व आढावा घेतला असून, प्रत्येक रुग्णावर दर्जेदार उपचार मिळावेत यासाठी प्रशासन सज्ज आहे. जवळपास २५० डॉक्टर व आरोग्य कर्मचारी या शिबिरात सहभागी होणार आहेत.

**रुग्णांनी या सेवा घेण्यासाठी काय आणावे?**

शिबिरासाठी येणाऱ्या नागरिकांनी आपले आधार कार्ड व रेशन कार्ड अनिवार्यपणे सोबत आणावे, असे आवाहन आमदार राजेश बकाने यांनी केले आहे.

**या शिबिरात खालील मोफत आरोग्यसेवा दिल्या जाणार आहेत:**

नेत्र तपासणी व मोतीबिंदूवरील मोफत शस्त्रक्रिया
मोफत चष्मे वाटप
दंतरोग तपासणी व औषधोपचार
मधुमेह व उच्च रक्तदाब तपासणी व औषधोपचार
रक्त तपासणी
आयुष्यमान भारत कार्ड नोंदणी
ई.सी.जी. तपासणी
दिव्यांग रुग्णांवर उपचार व आवश्यक सहाय्य वस्तूंचे वितरण
मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत गरजू रुग्णांना मदत

## कारगिल विजय दिवसाचा राष्ट्रभक्तीपूर्ण उत्सव श्री.संत नगाजी महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत उत्साहात संपन्न



**वर्धा । प्रतिनिधी**

श्री. संत नगाजी महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत कारगिल विजय दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य ए. व्ही. पोटदखे होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून अमित ठाकुर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी संस्थेतील सर्व कर्मचारी व प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात अमित ठाकुर यांनी कारगिल युद्धातील शौर्याची आठवण करून दिली. त्यांनी सांगितले की, कारगिल विजय दिवस हा केवळ एका युद्धातील विजय नसून, भारतीय जवानांच्या असामान्य शौर्य, पराक्रम व त्यागाचे प्रतीक आहे. १९९९ मध्ये उंच पर्वतरांगांमध्ये लढलेल्या या युद्धात आपल्या जवानांनी दुर्गम परिस्थितीत पाकिस्तानच्या सैन्याला पराभूत करून ऐतिहासिक विजय मिळवला. यामध्ये आपल्याला राष्ट्रीय एकतेचे दर्शन घडते. युवकांनीही या परंपरेतून प्रेरणा घेऊन देशासाठी सदैव सज्ज राहिले पाहिजे.कार्यक्रमाच्या शेवटी पंकज ठाकरे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संस्थेतील सर्व निदेशक व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

## निसर्ग संवर्धन ही काळाची गरज–मनोज वसू






**पुलगाव । प्रतिनिधी**

निसर्ग ही आपली आई असून तिचे रक्षण आणि संवर्धन करणे हे प्रत्येक सुजाण नागरिकाचे आद्यकर्तव्य आहे. वृक्षारोपण ही केवळ एक कृती नसून, भावी पिढ्यांच्या सुरक्षित भविष्यासाठी केलेला अत्यंत महत्त्वाचा उपक्रम आहे, असे विचार पुलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मनोज वसू यांनी व्यक्त केले.ते माजी मंत्री व माजी आमदार रणजीत कांबळे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमात बोलत होते. यावेळी परिसर हिरवागार करण्याच्या संकल्पासह निसर्ग संरक्षणाचा संदेश देत, विविध प्रकारच्या रोपांचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमात माजी मंत्री रणजीत कांबळे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून केक कापण्यात आला आणि निसर्गप्रेमाचे प्रतिक असलेले वृक्षारोपण करून एक प्रेरणादायी उदाहरण सर्वांसमोर ठेवण्यात आले.कार्यक्रमात काँग्रेसचे माजी अध्यक्ष रमेश सावरकर, नोमन अली बोहरा, सुनील कामनापुरे यांनी आपले मनोगत व्यक्त करत कांबळे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या व निसर्ग संरक्षणासाठी सर्वांनी पुढे यावे, असे आवाहन केले.

या कार्यक्रमाला शहर काँग्रेस अध्यक्ष सुनील ब्राम्हणकर, महिला अध्यक्ष रंजना पवार, तसेच प्रमोद घालनी, हाजी इकबाल भाई, डॉ. मिलिंद ठोंबरे, बहादूर चौधरी, पवन साहू, शब्बीर पठाण, सुशील तिवारी, रवींद्र चौधरी, नटवरलाल मोकाती, श्याम टावरी, बंटी सोनी, दीपक छालिवाल, रवी केशरवाणी, मिहिर शुक्ला, शंकर खंडागळे, राजू लोहकरे, प्रमोद बिरे, राजेश खोडे, मनोज श्रीवास, जाकीर भाई, मिलिंद सांगोले, अवधूत दुपारे, शांती खैरकार, वहिदा शेख, संजय पवार, देवानंद येसणकर, अनिल डंभारे, पलाश चांडक, मोहन नावाडे यांच्यासह अनेक मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या माध्यमातून पर्यावरण रक्षणाचा आणि वृक्षसंवर्धनाचा सशक्त संदेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व कार्यकर्ते आणि स्वयंसेवकांचे मोलाचे योगदान लाभले.

## सोनोरा येथे बजरंग दल शाखेचे उद्घाटन युवा कार्यकर्त्यांना जबाबदाऱ्या वितरित

**पुलगाव । प्रतिनिधी**

विश्व हिंदू परिषद प्रखंड पुलगाव अंतर्गत बजरंग दलाच्या सोनोरा ढोक शाखेचे उद्घाटन नुकतेच उत्साहात पार पडले. या उद्घाटन प्रसंगी प्रखंड पातळीवरील पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नव्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली आणि युवा कार्यकर्त्यांना धर्मसेवेचे दायित्व सोपवण्यात आले.



**नवीन कार्यकारिणीची नियुक्ती पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आली:**

शाखा संयोजक – शुभम पेंडाम
सहसंयोजक – गौरव मांढरे, संगम मांढरे
सत्संग प्रमुख – मोहित ढोक
बजरंगी सदस्य म्हणून पुढील युवकांची निवड करण्यात आली:

चेतन देवगढ़े, प्रथम ढोक, सारंग गाते, गजानन दिघोरे, अभी पारीसे, राज कडू, प्रतीक चाचेरकर, हर्षल देवगढ़े, बादल गाते, दीपक भंडारे, नागेश्वर मांढरे, कार्तिक लोखंडे, सारंग नागपुरे, रोहित नारनवरे, शिवम ढोक, प्रज्वल ठाकरे, जितेश नन्हे.या कार्यक्रमात विहिप प्रखंड मंत्री नीरज ब्राम्हणे आणि बजरंग दल प्रखंड संयोजक अविनाश खोडे यांच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांना पद व जबाबदाऱ्या देण्यात आल्या. अविनाश खोडे यांनी सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना धर्मकार्य, सेवा आणि राष्ट्रनिर्माणासाठी कार्य करण्याच्या शुभेच्छा दिल्या.या नव्या शाखेमुळे सोनोरा परिसरात धार्मिक व सामाजिक कार्यांना गती मिळणार असून, तरुणाईला एक सशक्त व प्रेरणादायी व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

### राष्ट्रीय पातळीवर इंदापूरचा झेंडा फडकवणार!

## विद्या प्रतिष्ठान इंग्लिश मीडियम स्कूल इंदापूरच्या हँडबॉल संघाची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**इंदापूर । दत्तात्रय गवळी**

विद्या प्रतिष्ठान इंग्लिश मीडियम स्कूल, इंदापूर या शाळेच्या १७ वर्षांखालील हँडबॉल संघाने सीबीएसई साऊथ झोन हँडबॉल स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे.

सीबीएसई साऊथ झोन हँडबॉल स्पर्धा २४ जुलै ते २७ जुलै २०२५ या कालावधीत साध्वी प्रीतीसुधाजी इंटरनॅशनल स्कूल, राहाता, जि. अहमदनगर येथे पार पडली. या स्पर्धेसाठी केरळ, कर्नाटक, महाराष्ट्र व गोवा राज्यांमधून एकूण ४८ संघ सहभागी झाले होते.



इंदापूर इंग्लिश मीडियम स्कूलच्या संघाने उल्लेखनीय कामगिरी करत पहिल्या सामन्यात हॅप्पी व्हॅली स्कूल, बेंगलुरू यांच्यावर १३–० असा विजय मिळवला. दुसऱ्या सामन्यात एज्यु. एशिया स्कूल, वेल्लोर, कर्नाटक विरुद्ध ९–०, तिसऱ्या सामन्यात अल्फान्सो स्कूल, केरळ विरुद्ध ८–० असा विजय मिळवत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. उपांत्य व अंतिम सामन्यांतही संघाने दर्जेदार खेळ करत अंतिम सामन्यात केएलई इंटरनॅशनल स्कूल, गोकाक, कर्नाटक यांचा ६–२ असा पराभव करून प्रथम क्रमांक पटकावला.

या विजयी संघात विराज रेडके, देवराज पाटील, सोनिश शहा, अथर्व बोराटे, आदित्य खाडे, विश्वराज ननवरे, प्रत्युष जगताप, वेदांत राऊत, ज्योतिरादित्य बागल, शौर्य गणेशकर, चैतन्य खामगळ, ज्योतिरादित्य राजेभोसले व अजिंक्य यादव या खेळाडूंनी दमदार कामगिरी केली. प्रशिक्षक व मार्गदर्शनाची जबाबदारी संभाजी पवार यांनी पार पाडली.

पुढील राष्ट्रीय स्पर्धा ८ ते ११ सप्टेंबर २०२५ दरम्यान नोजगे पब्लिक स्कूल, श्री गंगानगर (राजस्थान – भारत–पाकिस्तान सीमेच्या जवळ) येथे पार पडणार आहेत. शाळेच्या प्राचार्या ज्योती जगताप यांनी विजयी खेळाडू व मार्गदर्शकांचे अभिनंदन केले आहे.

## ज्ञानविकास विद्यालयात 'सक्षम तू' अभियानांतर्गत जनजागृती कार्यशाळा

**पिशोर । जावेद शेख**

भराडी येथील ज्ञानविकास प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात श्रीमान अशोकदादा गरुड शैक्षणिक समूह, सिल्लोड यांच्या वतीने 'सक्षम तू' अभियानांतर्गत जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. महिला आयोग व छत्रपती संभाजीनगर शिक्षणाधिकारी श्रीमती अश्विनी लाठकर, जयश्री चव्हाण व अरुणा भूमकर यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या या राज्यव्यापी मोहिमेतून विद्यार्थ्यांना मानसिक व शारीरिक सक्षमता याबाबत मार्गदर्शन करण्यात येते.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सिल्लोड ग्रामीण पोलीस स्टेशनचे स.पो.नि. रवींद्र प्रेमसिंग ठाकरे उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले, सक्षम म्हणजे कुठल्याही कार्यासाठी सज्ज असणे व आपल्या क्षमता सिद्ध करणे. मानसिक क्षमतेसोबतच शारीरिक क्षमताही विकसित करणे आवश्यक आहे. मोबाईल व टीव्हीच्या अतिवापरापासून दूर राहून क्रीडेत सहभाग घ्यावा आणि अन्याय सहन करू नये. त्रास झाल्यास ११२ वर फोन करावा. तसेच 'गुड टच – बॅड टच' बाबत सजग राहावे.ठाकरे यांनी नुकत्याच झालेल्या जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत ग्रामीण भागातून पुढे येत विजय मिळवलेल्या नागपूरच्या १९ वर्षीय दिव्या



देशमुखचे उदाहरण देत विद्यार्थ्यांना प्रेरित केले.

कार्यक्रमात जुलै महिन्याच्या वैयक्तिक चाचणीत प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस स्वरूपात क्रीडा व शैक्षणिक साहित्य देण्यात आले. त्यात सार्थक योगेश चिकने, प्रवीण रवी शिंदे, समृद्धी दीपक शेळके, हिंदवी अनिल काकडे, समृद्धी कृष्णा दुतोंडे, संध्या अण्णा खांदवे, प्रांजल विलास आग्रे, अर्जुन विठ्ठल सुस्ते, शिवानी संजू साळवे, आयुष्य कृष्णा घोंगते, वैभव गणेश खुर्द, अभिजीत श्रावण शेळके, रुद्र न्यानेश्वर आग्रे, प्रेरणा काकासाहेब मुरमे, साई बापू काकडे, साईराज संतोष शेळके, प्रांजल रामचंद्र मनगटे, सोहम दादाराव आग्रे, ओम दिलीप मुरकुटे, हर्षल ज्ञानेश्वर आग्रे, समर्थ भानुसे, दिव्या राजू माचवे, समर्थ रंगनाथ मानकर, अनुजा योगेश चिंचपुरे, जुनेद फारुख पटेल, अनन्या अंकुश पाटील, यश संजय अक्कर, आदित्य शांताराम पांडव आदींचा समावेश होता.

शाळा स्तरावर झालेल्या वैज्ञानिक वकृत्व स्पर्धेत 'क्वांटम युगाची सुरुवात व संभाव्यता व आव्हाने' या विषयावर भक्ती तुकाराम जाधव हिने प्रथम तर अथर्व मनोज मुळे याने द्वितीय क्रमांक पटकावला. विजेत्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमात संस्थेचे प्रमुख अशोकदादा गरुड यांनी विद्यार्थ्यांच्या संरक्षण व सुरक्षिततेबाबत अधिकाधिक सेवा पुरविण्याची ग्वाही दिली. यावेळी पोलीस हवालदार रामेश्वर जाधव, विद्यालयाचे मुख्याध्यापक, सहशिक्षकवृंद व शालेय वाहनचालक–मालक उपस्थित होते.

## ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे वटवृक्ष श्रीराम शिक्षण संस्था



**धामणगाव रेल्वे (प्रशांत मुन)**

धामणगाव रेल्वे तालुक्यातील श्रीराम शिक्षण संस्था ही केवळ दगडाविटांची इमारत नसून ग्रामीण आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे महत्त्वपूर्ण दालन असल्याचे प्रतिपादन संस्थेचे माजी अध्यक्ष व प्रख्यात डॉक्टर अशोक भैया यांनी केले.स्व. नंदलाल कन्या विद्यालय व श्रीराम कनिष्ठ महिला महाविद्यालयातील शारीरिक शिक्षक संजय बाळापुरे यांच्या सेवानिवृत्ती कार्यक्रमानिमित्त ते शाळेच्या प्रांगणात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव घनश्याम मेश्राम होते. यावेळी शाळा समिती अध्यक्ष संजय राठी, संचालक किशोर साकुरे, गोपाल भूत, प्राचार्या अर्चना राऊत, सेवानिवृत्त शिक्षक संजय बाळापुरे व काजल बाळापुरे, श्रीराम विद्यालय सोनेगाव खर्ड्याचे मुख्याध्यापक वासुदेव पाटील, सामाजिक कार्यकर्ते सतीश राऊत आदी मान्यवर उपस्थित होते.अध्यक्षीय भाषणात घनश्याम मेश्राम यांनी सांगितले की, श्रीराम शिक्षण संस्थेची स्थापना अरुणभाऊ अडसड यांच्या सहकार्याने करण्यात आली. संस्थेच्या यशस्वी वाटचालीत सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांनी केवळ नोकरी म्हणून नव्हे तर सेवाभावाने कार्य केल्यामुळे संस्था नावारूपास आली आहे. सत्काराचे उत्तर देताना भावनाविवश झालेल्या संजय बाळापुरे यांनी अश्रू अनावर झाले. कार्यक्रमात गोपाल भूत, कमल छांगाणी, प्रा. वृंदा जोशी, राजेश बानाईत तसेच बाळापुरे यांची कन्या रिया व आर्या यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्राचार्या अर्चना राऊत यांनी केले तर सूत्रसंचालन संजय जाधव व आभार योगेश गायगोले यांनी मानले.

# शिक्षकांना प्रशिक्षणासाठी कार्यमुक्त न करणाऱ्या कुर्डुवाडीतील मुख्याध्यापकावर होणार शास्तीची कारवाई

**सोलापूर । प्रतिनिधी**

राज्यातील शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षण २.० हे शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी अनिवार्य असूनही, कुर्डुवाडी येथील नूतन विद्यालय माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापकांनी शाळेतील ३५ शिक्षकांना कार्यमुक्त केले नव्हते. या गंभीर प्रकरणी शिक्षण आयुक्तांकडून संबंधित मुख्याध्यापकावर प्रशासकीय शास्तीची कारवाई होणार आहे.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (पुणे) चे संचालक राहुल रेखावर यांनी या संदर्भात शिक्षण आयुक्तांना पत्र पाठवून तातडीची कारवाई करण्याची विनंती केली आहे.या कारवाईची पार्श्वभूमी शिक्षक भारती सोलापूरचे जिल्हाध्यक्ष सुजितकुमार काटमोरे यांनी केलेल्या लेखी तक्रारीतून उभी राहिली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या सर्व शिक्षकांसाठी क्षमतावृद्धी प्रशिक्षण अनिवार्य आहे. शासनाने शाळांना शिक्षकांना कार्यमुक्त करण्याचे स्पष्ट निर्देश दिले असतानाही मुख्याध्यापकांनी त्याकडे दुर्लक्ष केले. शिक्षक भारतीने याविरोधात राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (पुणे) येथे तक्रार दाखल केली. त्यानंतर जिल्हा शैक्षणिक प्रशिक्षण संस्था, वेळापूर यांच्याकडून दोन वेळा सविस्तर अहवाल मागवण्यात आला. या अहवालांच्या आधारे संचालक रेखावर यांनी संबंधित मुख्याध्यापक दोषी असल्याचे स्पष्ट करत शिक्षण आयुक्तांना कारवाईसाठी निर्देश दिले आहेत. या निर्णयाची माहिती शिक्षण आयुक्त कार्यालयाला देण्यात आली असून, माध्यमिक शिक्षण संचालकांमार्फत अधिकृत कारवाई लवकरच होणार आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या २३ सप्टेंबर २०२१ च्या शासन निर्णयानुसार, प्रशिक्षणास जाणूनबुजून गैरहजर राहिल्यास किंवा शिक्षकांना कार्यमुक्त न केल्यास शास्तीची तरतूद आहे, हेही संचालक रेखावर यांनी पत्रात अधोरेखित केले आहे. या निर्णायक कारवाईमुळे शिक्षकांच्या हक्कांना गदा आणणाऱ्या मनमानी प्रवृत्तीला आळा बसेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षण ही केवळ औपचारिकता नाही, तर गुणवत्तापूर्ण



शिक्षणासाठी आवश्यक घटक आहे. शिक्षकांना कार्यमुक्त न करण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही. कुर्डुवाडी प्रकरणात आमच्या वेळेवरच्या तक्रारीमुळे शिक्षकांच्या हक्कांना न्याय मिळाला. भविष्यातही अशा अन्यायाविरोधात आमचा लढा तीव्रतेने सुरू राहील.

– विजयकुमार गुंड, जिल्हा प्रवक्ता, शिक्षक भारती सोलापूर

## रुख्माबाई पाल बहुउद्देशीय शिक्षण संस्थेद्वारे वृक्षारोपण व एकल महिलांच्या मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप



**तळोधी (बा.) । प्रणय बांगरे**

हाराष्ट्र राज्यातील सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ आणि पत्रकार हेरंब कुलकर्णी नगर तसेच महाएनजीओ फेडरेशन पुणेचे संस्थापक अध्यक्ष व गोसेवा व संवर्धन समिती, महाराष्ट्र शासन (राज्यमंत्री) चे अध्यक्ष शेखरभाऊ मुंदडा यांच्या प्रेरणेने स्व. रुख्माबाई पाल बहुउद्देशीय शिक्षण संस्था वर्धा संचालित एकल महिला समिती, तालुका नागभिड व सिंदेवाही यांच्या वतीने वृक्षारोपण आणि एकल महिलांच्या मुलामुलींसाठी शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम संस्था कार्यालय तळोधी (बाळापूर), जिल्हा चंद्रपूर येथे पार पडला.

एकल महिलांच्या मुलामुलींमध्ये पर्यावरण विषयक जागृती निर्माण करणे, शिक्षणाची आवड वाढवणे तसेच एकल महिलांना थोडेफार आर्थिक सहकार्य करणे हा या उपक्रमामागील उद्देश होता. संस्थेचे सचिव हरीश्चंद्र पाल यांच्या मार्गदर्शनाखाली एकल महिलांच्या मुलांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर नागभिड आणि सिंदेवाही तालुक्यातील अनेक एकल महिलांच्या मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.कार्यक्रमाला मोठ्या संख्येने एकल महिला आपल्या मुलांसह उपस्थित होत्या. उपक्रमाच्या यशस्वितेसाठी संस्थेचे सामाजिक कार्यकर्ते कुमोद शेंडे, भाग्यश्री नंगरे, रफिका पठाण व उर्मिला राऊत यांनी मोलाचे सहकार्य केले.

## मूल येथे १ ते ७ ऑगस्टदरम्यान साजरा होणार महसूल सप्ताह तहसीलदार मृदुला मोरे

**मूल । प्रतिनिधी**

मूल तहसीलस्तरीय महसुली कामे वेळेत पूर्ण करून अभिलेख अद्ययावत ठेवणे, मोजणी करणे, अपील प्रकरणांची चौकशी करणे, महसूल गोळा करणे तसेच महसूल उद्दिष्टे साध्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यासाठी दरवर्षी १ ऑगस्ट हा महसूल दिन साजरा केला जातो.



यावर्षी महसूल विभागाच्या सेवा आणि योजनांबाबत नागरिकांमध्ये जागरूकता वाढविणे तसेच शासनाबद्दलचा विश्वास दृढ करण्याच्या उद्देशाने १ ते ७ ऑगस्टदरम्यान महसूल सप्ताह साजरा करण्याच्या सूचना शासनाने दिल्या आहेत.या आठवड्यात विविध लोकाभिमुख उपक्रम राबविण्यात येणार आहेत. १ ऑगस्ट रोजी महसूल दिन साजरा करून सप्ताहाचा शुभारंभ होणार असून महसूल संवर्गातील कार्यरत व निवृत्त अधिकारी-कर्मचारी यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार तसेच लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण करण्यात येईल.२ ऑगस्ट रोजी सन २०११ पूर्वीपासून शासकीय जागेवर राहणाऱ्या पात्र कुटुंबांना अतिक्रमित जागांचे पट्टे वाटप केले जाईल. ३ ऑगस्ट रोजी पाणंद व शिवरस्त्यांची मोजणी करून रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात येईल. ४ ऑगस्ट रोजी प्रत्येक मंडळात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबविले जाईल. ५ ऑगस्ट रोजी विशेष सहाय्य योजनेतील डीबीटी न झालेल्या लाभार्थ्यांना घरभेटीद्वारे अनुदान वाटप होईल. ६ ऑगस्ट रोजी शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे हटवली जातील.सप्ताहाचा समारोप ७ ऑगस्ट रोजी एम-सँड धोरणाची अंमलबजावणी करून नवीन मानक कार्यपद्धतीनुसार धोरण पूर्णत्वास नेऊन सांगता समारंभाने केला जाणार आहे.महसूल सप्ताहातील विविध उपक्रमांचा तालुक्यातील नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मूलच्या तहसीलदार मृदुला मोरे यांनी केले आहे.

## बांधावर नारळ लागवडीचा पात्र शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा : तहसीलदार शिल्पा ठोकडे



**सोलापूर । प्रतिनिधी**

बांधावर नारळ लागवड हा अत्यंत उपयुक्त उपक्रम असून पात्र शेतकऱ्यांनी त्याचा लाभ घ्यावा,असे आवाहन तहसीलदार शिल्पा ठोकडे यांनी केले. बिटरगाव श्री येथे राज्य सरकारच्या १५० दिवसांच्या कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमधून 'जिथे ऊस तिथे बांधावर नारळ लागवड' या उपक्रमाचा शुभारंभ गुरुवारी करण्यात आला.या वेळी तालुका कृषी अधिकारी देवराव चव्हाण, मंडळ कृषी अधिकारी अमर अडसूळ, मंडळ अधिकारी बनसोडे, करमाळा पंचायत समितीचे महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेचे सहायक कार्यक्रम अधिकारी हनुमंत राजपूत, तांत्रिक सहायक शिवकुमार यादव, सहायक कृषी अधिकारी दादासाहेब नवले, पोलिस पाटील शोभा अभिमन्यू, पत्रकार अशोक मुरूमकर, सामाजिक कार्यकर्ते बबनराव मुरूमकर, गजेंद्र बोराडे, माजी सरपंच डॉ. अभिजित मुरूमकर, दौलत वाघमोडे, बबनराव मुरूमकर आदी उपस्थित होते.या उपक्रमासाठी करमाळा तालुक्यातील वडगाव व बिटरगाव श्री या दोन गावांची निवड झाली आहे. गावातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या बांधावर नारळ लागवडीसाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून दोन ग्रामपंचायतींची निवड करण्यात आली असून उपजिल्हाधिकारी अंजली मरोड यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे.बिटरगाव श्री येथे सीआरए (हवामान-लवचिक शेती) तंत्रज्ञानाचा वापर करून नारळ लागवडीचा शुभारंभ झाला. हे तंत्रज्ञान म्हणजे बदलत्या हवामानाचा शेतीवर होणारा परिणाम कमी करण्यासाठीचे उपाय. विशेषतः कमी पाण्यात किंवा पाण्याची उपलब्धता कमी झाल्यास पिकांचे उत्पादन वाढवण्यासाठी आणि जोपासनेसाठी हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरते.

## प्रणय वाघमारे यांनी पारंपरिक शेतीला फाटा देत एस.आर.टी पद्धतीने घेतले भरघोस उत्पन्न

**चिमूर । शेषराव राऊत**

कुठल्याही परिस्थितीत बदल ही काळाची गरज असते. असा बदल चिमूर तालुक्यातील कन्हाळगाव येथील प्रणय सुधाकर वाघमारे यांनी आपल्या शेतीत घडवून आणला आहे. शिक्षणासोबतच शेतीतही रस असलेल्या प्रणय यांना लहानपणापासूनच शेतीची आवड असल्याने त्यांनी पारंपरिक शेतीला दूर करत उत्पादन खर्च कमी करण्यासाठी 'सगुणा पुनरुत्पादक तंत्र' (एस.आर.टी.) पद्धतीचा अवलंब केला आहे.



थोडक्यात सांगायचे झाल्यास या पद्धतीमध्ये एकदाच ट्रॅक्टरच्या साहाय्याने जमिनीची मशागत केली जाते. त्यानंतर वर्षानुवर्षे पुन्हा मशागत न करता मागील वर्षीच्या पिकाचे अवशेष जमिनीत कुजवून त्यांचा वापर पुढील पिकासाठी केला जातो. पिकांमध्ये फेरबदल (पिकांची अदलाबदल) करून शेती केली जाते. यात फक्त लागवड आणि कापणीच्या वेळीच मजूर लागतात. यानंतर कुठल्याही प्रकारची मशागत केली जात नाही. तण नियंत्रणासाठी तणनाशकांचा वापर केला जातो. प्रणय यांनी कोरडवाहू जमिनीत या नवीन पद्धतीचा अवलंब करून भात पीक घेतले आहे. उन्हाळ्यात जमिनीची मशागत करून १ मीटर रुंदीचे गादीवाफे तयार करण्यात आले. पहिल्या पावसानंतर एस.आर.टी. साचे आणि मजुरांच्या साहाय्याने भाताची लागवड करण्यात आली. यात पारंपरिक पद्धतीप्रमाणे चिखलणी व रोपांची रोवणी करण्यात आली नाही.या पद्धतीमुळे बियाणे, मजूर, मशागत, खते आणि औषधे यांवरील खर्च लक्षणीयरीत्या कमी होतो. गेल्या दोन वर्षांत त्यांनी कोरडवाहू शेतामध्ये कापूस, तूर आणि भात ही पिके एस.आर.टी. पद्धतीने घेतली आहेत. या तंत्रामुळे पिकांचे धनकटे जमिनीत कुजून जैविक खत तयार होते. त्यामुळे रासायनिक खतांची गरज कमी भासते. परिणामी मशागतीचा खर्च कमी होतो आणि पारंपरिक पद्धतीपेक्षा उत्पादन वाढते, असा अनुभव प्रणय यांनी सांगितला.

## मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणी साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर यांच्यासह सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता

**मुंबई । विराम पवार**

ज्यांनी भगव्यावर अत्याचार केला त्याला देव शिक्षा देईल, मी आता प्रसन्न आहे,अशी पहिली प्रतिक्रिया हिंदुत्ववादी नेत्या साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर यांनी मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात निर्दोष मुक्तता झाल्यानंतर व्यक्त केली.

महाराष्ट्राला हादरवणाऱ्या मालेगाव बॉम्बस्फोटाला तब्बल १७ वर्षांनंतर निकाल लागला आहे. २९ सप्टेंबर २००८ रोजी नाशिक जिल्ह्यातील मालेगाव येथे रात्रीच्या सुमारास झालेल्या स्फोटात सहा जणांचा मृत्यू झाला होता, तर १०० हून अधिक जखमी झाले होते. रमजानच्या महिन्यात नमाजासाठी जाणाऱ्या नागरिकांवर हा स्फोट झाला होता. घटनास्थळी सापडलेल्या दुचाकीचा संबंध साध्वी प्रज्ञा ठाकूर यांच्याशी जोडला गेल्याने त्यांच्यासह अनेकांवर आरोप ठेवण्यात आले होते.

मुंबई सत्र न्यायालयाच्या विशेष एनआयए (राष्ट्रीय तपास संस्था) न्यायालयाने आज



या प्रकरणाचा निकाल देताना ठोस पुरावे नसल्याने साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर, कर्नल प्रसाद पुरोहित, मेजर रमेश उपाध्याय यांच्यासह एकूण १७ आरोपींना निर्दोष मुक्त केले.

न्यायालयाने निरीक्षणात म्हटले की, केवळ संशयाच्या आधारे आरोपींना दोषी ठरवता येत नाही. स्फोट स्कूटरमध्ये झाला हे सरकारी पक्ष सिद्ध करू शकला नाही. तपासात अनेक त्रुटी राहिल्या आहेत, पंचनामे योग्य पद्धतीने झाले नाहीत, जागेवरून हाताचे ठसे जप्त झाले नाहीत, तसेच बैठकांविषयी सरकारी पक्षाचे दावे समाधानकारक नाहीत.तसेच, साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर या दुचाकीच्या मालक असल्याचेही स्पष्ट पुरावे सादर झाले नाहीत. आधी लावलेला मोक्का नंतर मागे घेतल्याने त्या अंतर्गत नोंदवलेले जबाब निरर्थक असल्याचे न्यायालयाने सांगितले. यूएपीए(गैरकायदा क्रियाकलाप प्रतिबंधक कायदा) लागू करण्यासाठी घेतलेली परवानगीही चुकीची असल्याचे नमूद केले.

कर्नल प्रसाद पुरोहित यांनी आरडीएक्स आणल्याचा कोणताही पुरावा नसल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले. त्यामुळे सर्व आरोपींना संशयाचा लाभ (बेनेफिट ऑफ डाऊट) देत निर्दोष मुक्त करण्यात आले.

## सेवानिवृत्त मुख्याध्यापक विलास शिराळ यांच्या स्मरणार्थ शाळेस आरसीसी कमान व गेटचे उद्घाटन

**सोलापूर । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खडकी (ता. करमाळा) येथे सेवानिवृत्त मुख्याध्यापक विलास गुरुलिंग शिराळ (शिराळ गुरुजी) यांच्या स्मरणार्थ शाळेच्या आरसीसी कमान व गेटचे उद्घाटन शुक्रवार, ३१ जुलै २०२५ रोजी उत्साहात पार पडले. शिराळ गुरुजी यांनी आपल्या शिक्षक सेवेची सुरुवात याच शाळेतून केली होती आणि याच ठिकाणी मुख्याध्यापक पदावरून सेवानिवृत्त झाले होते.




शाळेच्या विकासासाठी सदैव पुढाकार घेतलेल्या शिराळ गुरुजी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांच्या कुटुंबीयांनी शाळेच्या अपूर्ण कंपाऊंड वॉलचे काम पूर्ण करून, सुमारे दीड लाख रुपयांचा खर्च करून आरसीसी कमान व प्रवेशद्वार उभारले आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन शिक्षणविस्तार अधिकारी टकले, केंद्रप्रमुख रमाकांत गटकळ, संतोष पोतदार, गावचे सरपंच उमाकांत बरडे, उपसरपंच अंगद शिंदे व शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सारिका कुंभार यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळीअमोल कुंभार, ईश्वर खरात, भारत मिरगे, केंद्रातील मुख्याध्यापक, शिक्षक व गावातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.शाळेचे मुख्याध्यापक महादेव शिंदे, प्रविण शिंदे, सुहास कांबळे, सतीश वीर, सुनिता काळे, शशिकांत क्षीरसागर, राम काळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.शिराळ गुरुजी यांच्या शिक्षण क्षेत्रातील योगदानाचा गौरव करत विद्यार्थ्यांसह पालक व ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहाने कार्यक्रमात सहभाग नोंदवला.

## डिकसळ पुलाच्या दुरुस्तीसाठी आ.नारायण आबा पाटील अलर्ट मोडवर; सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची भेट



**सोलापूर । प्रतिनिधी**

पुणे आणि सोलापूर जिल्ह्यांना जोडणारा उजनी जलाशयावरील ब्रिटिशकालीन डिकसळ पूल पावसामुळे ढासळल्याने करमाळा व इंदापूर तालुक्यातील नागरिकांचा संपर्क तुटला होता. उजनी जलाशयातील वाढत्या पाण्यामुळे पुलाचे मोठे नुकसान झाले. ही बाब कळताच आमदार नारायण आबा पाटील यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली.

तेथे उपस्थित नागरिकांनी लहान वाहनांसाठी वाहतुकीस परवानगी देण्याची मागणी केली होती. आमदार पाटील यांनी ही मागणी संबंधित विभागाकडे पोहोचवली व लहान वाहनांसाठी वाहतुकीस परवानगी मिळवून दिली. मात्र, पुलाची तातडीने दुरुस्ती आवश्यक असल्याचे लक्षात घेऊन त्यांनी यासाठी त्वरित पाठपुरावा सुरू केला आहे.

या संदर्भात आमदार नारायण आबा पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार यांना निवेदन पाठवले. त्यानंतर आज त्यांनी प्रत्यक्ष सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची भेट घेत पुलाची सद्यस्थिती आणि या पुलाचे महत्त्व सविस्तरपणे सांगितले.

या भेटीत पुलाच्या दुरुस्तीसाठी तातडीने पावले उचलण्याची मागणी करण्यात आली. मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी यावर सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच जुन्या पुलाची दुरुस्ती करण्यात येणार असल्याचे आश्वासन दिले.

आमदार नारायण आबा पाटील यांच्या तत्पर कार्यशैलीबद्दल पश्चिम भागातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## गोळवाडी येथे मनोज पाटील जरांगे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

**वैजापूर ज्ञ अर्जुन शिंदे**

वैजापूर तालुक्यातील गोळवाडी येथे मनोज पाटील जरांगे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

हा उपक्रम श्री दक्षिणमुखी हनुमान मंदिर आणि ओंकारेश्वर महादेव मंदिर परिसरात पार पडला.

या प्रसंगी नंदू मिसाळ, विक्रम पाटील शिंदे, माधव रोठे, शंकर दादा पगार, शामराव पगार, विष्णू आहेर, बबन पगार, नारायण शिंदे आणि राजू चव्हाण यांची उपस्थिती होती.

वृक्षारोपणाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत गावकऱ्यांनी मनोज पाटील जरांगे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

